बीड । महाराष्ट्र
बुधवार दि. ११ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३३८
पान १ । पाने ४
किंमत ३ रुपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com










## शेतकरी, बेरोजगारी अन् बीडच्या विकासावर...

# खा.सोनवणेंनी संसदेत उठविला आवाज

नवी दिल्ली । वृत्तसेवा

**महाराष्ट्रातील वाढते कृषी संकट, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, प्रादेशिक विकासातील असमतोल तसेच बीड जिल्ह्यातील अपूर्ण पायाभूत सुविधा या विविध मुद्द्यांवर खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत आवाज उठवला. लोकशाही व्यवस्थेत लोकप्रतिनिधींना त्यांच्या मतदारसंघातील प्रश्न मांडण्याचा पूर्ण अधिकार असला पाहिजे, असे सांगत त्यांनी सभागृहात अनेक गंभीर विषयांवर त्यांनी सरकारला धारेवर धरले. दरम्यान, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या विरूध्द असलेल्या अविश्वास ठरावाच्या समर्थनार्थ खा.सोनवणे यांनी मुद्देसूद भाषण करून देशाचे लक्ष वेधले.**



दिल्ली येथे संसदेतचे बजेट अधिवेशन सुरू आहे. सभागृहात बोलताना खा.बजरंग सोनवणे यांनी सोनवणे यांनी महाराष्ट्रातील कृषी संकटाची तीव्रता अधोरेखित केली. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या आकडेवारीनुसार देशातील शेतकरी आत्महत्यांमध्ये महाराष्ट्राचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. उत्पादन खर्च वाढत असताना पिकांना योग्य बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत असल्याचे त्यांनी सांगितले. यावर उपाय म्हणून किमान आधारभूत किंमत प्रभावीपणे लागू करणे, पीक विमा योजना मजबूत करणे आणि सिंचनाचा विस्तार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बीड जिल्ह्याच्या संदर्भात बोलताना सोनवणे यांनी ▶▶पान २ वर

### सिंचनात मराठवाडा मागे

खा.सोनवणे यांनी महाराष्ट्रातील प्रादेशिक विकासातील असंतुलनावरही भाष्य केले. पश्चिम महाराष्ट्रात सिंचन व औद्योगिक विकास झालेला असताना विदर्भ व मराठवाडा अजूनही मागे असल्याचे त्यांनी नमूद केले. या भागांमध्ये उद्योग, पायाभूत सुविधा आणि रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी विशेष धोरणांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

### पीक विम्यातील अडचणींचा वाचला पाढा

याशिवाय कापूस व सोयाबीनसारख्या पिकांवर आंतरराष्ट्रीय व्यापार करारांचा होणारा परिणाम, आयात वाढल्यास देशांतर्गत बाजारपेठ कमकुवत होण्याची शक्यता आणि कांद्याच्या किमतीतील अस्थिरतेमुळे शेतकऱ्यांना होणारे नुकसान या मुद्द्यांकडेही त्यांनी सरकारचे लक्ष वेधले. तसेच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची गरज, पीक विमा योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी आणि सहकारी बँकांमधील ठेवीदारांच्या सुरक्षेबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले.

### राष्ट्रवादीने दिली मोठी संधी

राष्ट्रवादी (शरद पवार गट)च्या वतीने अविश्वास ठराव्याच्या समर्थनार्थ बोलण्याची संधी खा. बजरंग सोनवणे यांना देण्यात आली होती. पक्षाच्या वतीने ही जबाबदारी खा.सोनवणे यांच्यावर दिली होती ख़ा.बजरंग सोनवणे हे कायम सामान्य माणसाचे प्रश्न संसदेत मांडत आलेले आहेत. याच कारणाने ही मोठी जबाबदारी देखील पक्षाने त्यांच्यावर दिली होती.

# बीड शहरातून तरुण बेपत्ता

बीड । प्रतिनिधी

शहरातील अंकुश नगर परिसरातील रोहन कल्याणराव कोलगंडे (वय ३६) हे दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी वॉकींगला जातो असे सांगून घराबाहेर पडले होते. मात्र ते त्यानंतर घरी परतले नसल्याने कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कुटुंबीयांनी नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परिसरात सर्वत्र शोध घेतला. परंतु त्यांच्याबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही. विशेष

### वॉकिंगला गेलेला तरुण परतलाच नाही

म्हणजे त्यांचा मोबाईल फोन घरातच असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधता आलेला नाही. याप्रकरणी कुटुंबीयांनी बीड शहरातील शिवाजी नगर पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली आहे.



# पाटोदा येथे माजी सैनिकाची तर गेवराईत शेतकऱ्याची आत्महत्या

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात आत्महत्येच्या दोन वेगवेगळ्या घटनांनी खळबळ उडाली असून पाटोदा येथे एका निवृत्त लष्करी जवानाने तर गेवराईत एका शेतकऱ्याने आपले जीवन संपवले आहे. पाटोदा येथील माऊली नगर भागात राहणारे उद्धव



जायभाय या माजी सैनिकाने राहत्या घरासमोरील आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली, त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. दुसऱ्या घटनेत गेवराई तालुक्यातील पौळाची वाडी येथील रखमाजी नारायण जाधव या शेतकऱ्याने नैराश्यातून विषारी औषध प्राशन करून आपली जीवनयात्रा संपवली. बीड येथील खासगी ▶▶पान २ वर

# सातबारा कोरा करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री यांनी पाळले नाही-आमटे

## कर्ज नवे-जुने नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक

बीड । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू असे आश्वासन दिले होते. मात्र निवडून आल्यानंतर कर्जमाफीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्यात आले असल्याची टीका शेतकरी हक्क मोर्चाचे कार्यकर्ते राजेंद्र आमटे यांनी केली आहे. शेतकरी नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली नागपूर येथे मोठे शेतकरी आंदोलन झाले होते. त्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र ते आश्वासन प्रत्यक्षात पूर्ण झाले नाही, ही बाब दुर्दैवी असल्याचे आमटे यांनी म्हटले आहे. नागपूर येथील आंदोलनानंतर अनेक बँकांनी शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित ठेवण्यासाठी कर्ज नवे-जुने करण्याची मोहीम राबवली. नवे-जुने केले तरी कर्जमाफीचा लाभ मिळेल असे खोटे




आश्वासन देऊन अनेक शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना देण्यात येणारे ५० हजार रुपयांचे अनुदान अपुरे असल्याचे सांगत ही रक्कम २ लाख रुपये करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. ५० हजार रुपयांची रक्कम शेतकऱ्यांच्या व्याजातच संपून जाते, त्यामुळे त्याचा फारसा लाभ होत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अनेक बँकांनी चुकीची माहिती देऊन शेतकऱ्यांचे कर्ज नवे-जुने करून घेतले असून ते कर्ज आजही शेतकऱ्यांच्या बोकांडी आहे. त्यामुळे ते कर्जही शासनाने माफ करावे, अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली. याबाबत बीड जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, शेतकरी नेते बाळासाहेब मोरे पाटील, युवा शेतकरी नेते अशोक ढोले पाटील, शेतकरी पुत्र संदीप नवले, खाजा भाई पठाण, नजीब भाई, राजू वीर, अर्जुन सोनवणे आदी उपस्थित होते.

## प्रतिक्रिया पाठवा...

## मराठवाडा पत्र चा ५ वा वर्धापन दिन

आपल्या सर्वांच्या आवडीचे लोकप्रिय दैनिक मराठवाडा पत्र गुरूवार (दि.१९ मार्च २०२६) रोजी पाच वर्ष पूर्ण करत यशस्वीपणे सहाव्या वर्षांमध्ये पदार्पण करत आहे... या पाच वर्षात आपण आम्हाला भरभरून प्रेम दिले... कोरोना महामारी सारख्या भिषण संकट काळात देखील आपण साथ दिली... पाचव्या वर्धापन दिनानिमित्त आम्ही १९ मार्च रोजी विशेषांक प्रकाशित करत आहोत... या अंकात तुमची प्रतिक्रिया आम्हाला हक्काने हवी आहे... पुढील वाटचालीसाठी आपल्या प्रतिक्रिया हेच आमचे बळ आहे... यामुळे आपण खालील ई- मेल आयडीवर किंवा व्हॉट्सअॅप क्रमांकावर प्रतिक्रिया पाठवाव्यात... दै. मराठवाडा पत्र परिवार आपल्या प्रतिक्रिया जानुन घेण्यासाठी उत्सुक आणि आतुर आहे...
दि. १७ मार्चपर्यंत आपल्या प्रतिक्रिया पाठवाव्यात. सोबत आपला पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्य पाठवावा... आपल्या बोलक्या प्रतिक्रिया १९ मार्चच्या अंकात आम्हाला प्रसिध्द करायच्या आहेत...

■ प्रतिक्रीया पाठवण्यासाठी...
व्हाट्सअॅप नं. **9822152955**
ई-मेल: **Email-dailyamarathwadapatra2021gmail.com**

दत्तात्रय नरनाळे
(संपादक : दै. मराठवाडा पत्र)

## संपादकीय

# अद्भूत... अविश्वसनीय!

टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर ओसंडून वाहणा-या 'लखपती' महासागराच्या तोंडून अद्भूत अविश्वसनीय असेच उद्गार 'छलकले' असतील! सूर्या सेनेने ९६ धावांनी ब्लॅक कॅप्सला खरपूस मार दिला. अनेक विक्रमांचे 'जाम' रिते झाले आणि नव्या विक्रमाचे पेग फेसाळले. टीम इंडियाला विजयाची नशा मिळावी म्हणून प्रार्थना, दुआ, होम-हवन, पूजा-अर्चा केल्या गेल्या. अखेर 'अगर किसी चीज को दिलसे चाहो, तो पुरी कायनात उसे तुमसे मिलाने की कोशिश में लग जाती है' हा एक हिंदी सिनेमातला डायलॉग भारतीय संघासाठी धाऊन आला, असे म्हणता येईल. भारतीय संघासाठी अहमदाबादचे स्टेडियम 'पनोती' आहे, शाप आहे या दंतकथाही सूर्याच्या संघाने खोट्या ठरवल्या. कारण या स्टेडियमवर दोन वेळा टीम इंडियाला पराभव चाखावा लागला होता. तेव्हा आता 'इजा-बिजा'नंतर 'तिजा' होतो की काय? अशी भीती क्रिकेट रसिकांना वाटत होती; परंतु कोच गौतम गंभीरच्या मार्गदर्शनाखाली आणि सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने योग्य नियोजन व जिद्दीच्या जोरावर विजय मिळवत 'ती' भीती दूर पिटाळताना क्रांती घडवली. जागतिक महिला दिनाचा आणि रंगपंचमीचा मुहूर्त साधत भारतीय संघाने विजयपंचमी साजरी केली आणि रविवारच्या मध्यरात्री दिवाळीतील उरले-सुरले आनंदाचे फटाके उडाले. रविवारी अंतिम सामना सुरू झाला तेव्हा देशातील प्रत्येक गरीब-श्रीमंताच्या हातातील मोबाईलवर सामन्याचे थेट प्रक्षेपण सुरू होते. जिओ-हॉट स्टारवर सुमारे ७९ कोटी प्रेक्षक सामना पाहत होते. भारतातील हे क्रिकेटवेड अचंबित करणारे आहे. याची कल्पना वेड्या सँटनरला नसावी. कारण तसे नसते तर त्याने टॉस जिंकल्यानंतर प्रथम क्षेत्ररक्षण स्वीकारले नसते. त्याचे दुसरे एक कारण असे की, तुम्ही क्षेत्ररक्षण घेतले म्हणजे लक्ष्याचा पाठलाग करणार आहात; परंतु लक्षावधी प्रेक्षकांच्या दबावरेट्याखाली धावांचा पाठलाग करणे कठीण असते. एक-दोन विकेट लवकर गेल्या की ते आणखी महाकठीण होऊन जाते. टॉसबाबत सूर्याची मजेशीर प्रतिक्रिया बघा- टॉस हरला आणि प्रतिपक्षाने फलंदाजी दिली की सूर्या म्हणतो, नाहीतरी आम्ही टॉस जिंकला असता तर प्रथम फलंदाजीच घेतली असती म्हणजे चित भी मेरी, पट भी मेरी! भारतीय संघाची 'रननिती' अशी की फटक्यांचा धुमधडाका लावून दोनशेपार जायचे. या प्रवासात एक-दोन विकेट गेल्या तरी धावगती कमी होऊ द्यायची नाही. 'पॉवर प्ले'चा भरपूर लाभ उठवायचा. उपउपांत्य, उपांत्य आणि अंतिम सामन्यात भारताची हीच रणनिती यशस्वी ठरली. संपूर्ण स्पर्धेत भारतीयांनी सांघिक खेळ केला. प्रत्येक सामन्यात विजयाचा शिल्पकार वेगळाच दिसायचा. संघातील प्रत्येक खेळाडूवर विश्वास ठेवल्याने संघाचे सांघिक यश उफाळून आले. आठव्या क्रमांकापर्यंत घणाघाती फलंदाज असल्याने दोनशेचा टप्पा सहज गाठता आला. प्रतिपक्षाचे गोलंदाज कायम दबावाखाली राहिले. स्पर्धेआधी अभिषेक शर्माने तुफान फटक्यांचा हिमालय उभा केला होता त्यामुळे स्पर्धेत त्याची बॅट धडाडणार असे वाटले होते. प्रत्यक्षात त्याला तीन 'भोपळे' मिळाल्याने त्याचा आत्मविश्वास ढेपाळला; परंतु संघ व्यवस्थापनाने त्याची काळजी घेतली, त्याला विश्वास दिला आणि कायम संधी देत राहिले. अंतिम सामन्यात त्याचे फळ मिळाले. पठ्ठ्याने १८ चेंडूतच स्पर्धेतील सर्वांत वेगवान अर्धशतक ठोकले. पॉवर प्लेमध्येच ९२ धावांचा डोंगर उभा राहिला. येथेच किवीज् संघ गारद झाला. भारतीयांनी आपल्या डावात १९ चौकार आणि १८ षटकार चढवले. प्रत्येक फलंदाजाचा नेट स्ट्राइक रेट १३० च्या पुढे होता. शिवम दुबेने ८ चेंडूत २६ धावा ठोकताना ३२५ चा स्ट्राइक रेट ठेवला. स्पर्धेत गोलंदाजी ही भारताची थोडीशी लंगडी बाजू होती. कारण सहावा गोलंदाज नव्हता; परंतु बुमराहने ती उणीव फारशी जाणवू दिली नाही. स्पर्धेत त्याने १४ बळी घेतले. अंतिम सामन्यात त्याने १५ धावांत ४ बळी घेतले. तोच सामनावीर ठरला. त्याच्या यॉर्करचा सामना करताना जगातल्या दिग्गज फलंदाजांची भंबेरी उडते हे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. भारताचे क्षेत्ररक्षण हा चिंतेचा विषय आहे मात्र त्यात हळूहळू सुधारणा होत आहे. सूर्या, हार्दिक, तिलक वर्मा, अक्षर पटेल, इशान किशन यांनी स्पर्धेत काही अद्भूत झेल पकडले आहेत. फलंदाजी ही भारताची फार मोठी शक्ती आहे. संजू सॅमसनने त्याचे प्रत्यंतर घडवले आहे. भारताचा कोणताही फलंदाज वैयक्तिक स्वार्थासाठी खेळला नाही. तसे असते तर संजू सॅमसनला ९७ वर असताना एक-एक धाव घेत शतक गाठता आले असते; परंतु त्याने वैयक्तिक हित न बघता संघहित महत्त्वाचे मानले. दोन वेळा नव्वदीच्या घरात पोहोचूनही त्याने संघासाठी चौकार-षटकार मारण्याचाच प्रयत्न केला. इशान किशनचेही तसेच. मूळ संघात त्याची निवड झाली नव्हती; परंतु संधी मिळाली आणि त्याने तिचे सोने केले. आजारातून उठलेल्या तिलक वर्माने तुफान फलंदाजी केली. शिवम दुबेच्या वाट्याला फारशी फलंदाजी आली नाही; परंतु संधी मिळाली तेव्हा त्याचा आनंद त्याने प्रेक्षकांना दिला. संपूर्ण स्पर्धेत सूर्या ऑफ कलर होता; परंतु त्याने नेतृत्व उत्तम केले. भारतीय बॅटिंगच्या त्सुनामीत न्यूझिलंड संघ वाहून गेला ही वस्तुस्थिती आहे. या विजयासह टीम इंडियाने अनेक जागतिक विक्रम मोडीत काढले. टी-२० विश्वचषकाचे जेतेपद राखणारा भारत जगातील पहिला संघ ठरला. मायदेशात यजमानपद भूषवताना विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला देश. या पूर्वी असा पराक्रम कोणत्याही यजमान देशाच्या संघाला जमले नाही. पाच विश्वचषक जिंकणारा भारत हा दुसरा संघ ठरला. भारताने एक दिवसीय दोन (१९८३, २०११) आणि टी-२० तीन (२००७, २०२४, २०२६) असे एकूण पाच विश्वचषक जिंकले आहेत. ऑस्ट्रेलियाच्या नावावर सर्वाधिक ७ (वनडे ६ आणि टी-२०- १) जेतेपद आहेत. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या गुलाबी चेंडूच्या कसोटीत भारतीय महिला पराभूत झाल्या. भारताच्या लक्ष्य सेनला ऑल इंग्लंड खुली बॅडमिंटन स्पर्धा जिंकण्यात अपयश आले; परंतु अहमदाबादमध्ये भारतीय संघाने किवीज्चा धुव्वा उडवला. भारताच्या क्रिकेटपटूंना हे जे यश मिळाले त्या मागे कदाचित 'लाटणे दहशत' असावी. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने भारतीय संघानेसुद्धा न्यूझिलंडला 'बॅट मार' दिला असावा!

## अंबाजोगाईत गुंडगिरीचा नंगानाच

# हॉटेल व्यावसायिक अविनाश मेहता यांच्यावर जीवघेणा हल्ला

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाईत वाढत्या गुंडगिरीचा नंगानाच पाहायला मिळाला आहे. स्त्यावर गाडीला बाजू देण्याच्या क्षुल्लक कारणावरून शहरातील नामांकित हॉटेल व्यावसायिक अविनाश परशुरामजी मेहता यांच्यावर लोखंडी रॉड आणि काठीने प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना रविवारी (दि.०८) सायंकाळी मोंढा भागातील मुख्य रस्त्यावर घडली. विशेष म्हणजे मारहाण केल्यानंतर हल्लेखोर टोळक्याने मेहता यांच्या हॉटेल मेवाड बिस्ट्रो येथे जाऊन तोडफोड केली. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलिसांनी राहुल भारत इदगले याच्यासह त्याच्या साथीदारांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी अविनाश मेहता यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, रविवारी सायंकाळी सव्वासात वाजण्याच्या सुमारास ते आपल्या मोटारसायकलवरून घरून हॉटेलकडे जात होते. ते मोंढ्यातील मुख्य रस्त्यावर असताना पाठीमागून आलेल्या एका पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारने त्यांना जोरात ५ ते ७ वेळा हॉर्न दिला. मेहता यांनी बाजूला गाडी थांबवली असता, कारमधील राहुल भारत इदगले आणि एका पवार आडनावाच्या व्यक्तीने त्यांना खाली उतरून अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. रस्ता असताना कार का आडवी लावली? असे विचारले असता, आरोपींनी मेहता यांना लोखंडी रॉड आणि काठीने डोक्यावर, हातावर, पाठीवर आणि पायावर बेदम मारहाण करून



गंभीर जखमी केले. यावेळी मध्यस्थी करणाऱ्या प्रतिक गुत्तेदार या तरुणालाही त्यांनी धक्काबुक्की केली. ही मारहाण सुरू असतानाच पोलिसांनी येण्याची चाहूल लागताच आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. गंभीर जखमी झालेल्या मेहता यांना अनिकेत देशपांडे आणि अफ्रोज पठाण यांनी उपचारासाठी एका एका खासगी रुग्णालयात दाखल केले. मारहाणीनंतर आरोपींनी मेहता यांचे हॉटेल असलेल्या मेवाड बिस्ट्रोवर धाव घेतली. तेथे राहुल इदगले, पवार आणि इतर दोन अनोळखी व्यक्तींनी लोखंडी रॉडने खुर्च्या आणि काउंटरची तोडफोड करून सुमारे २० हजार रुपयांचे नुकसान केले. जर पोलीस ठाण्यात तक्रार केली तर जिवे मारून टाकू, अशी धमकी देऊन आरोपींनी परिसरात दहशत निर्माण केली आणि मेहता यांचा मोबाईल घेऊन पसार झाले. या प्रकरणी मेहता यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र लक्ष्मणराव घुगे करत आहेत. अत्यंत वर्दळीच्या भागात टोळक्याने खुलेआम हिंसक धुडगुस घातल्यामुळे शहरातील व्यापाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## अल्पवयीन मुलीची छेडछाड करून आत्महत्येला प्रवृत्त करणाऱ्या

# तरुणाला सहा महिने कारावासाची शिक्षा

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीचा सतत पाठलाग करून, तिची छेडछाड व विनयभंग करत तिला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याप्रकरणी आरोपी मनेश उर्फ बाळू गंगाधर जायगुडे याला बीड जिल्हा व सत्र न्यायालयाने सहा महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश व्यंकटेश एच. पाटवदकर यांनी हा महत्वपूर्ण निकाल दिला असून आरोपीला एक हजार रुपये दंडही ठोठावला आहे. २९ मार्च २०२२ रोजी घडलेल्या या दुर्दैवी घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ माजली होती, ज्यामध्ये एका निष्पाप विद्यार्थिनीला समाजकंटकाच्या त्रासामुळे आपले जीवन संपवावे लागले होते. या प्रकरणाची पार्श्वभूमी अत्यंत हृदयद्रावक आहे. पीडित मुलगी बीड येथे शिक्षणासाठी असताना दिमाखवाडी येथील रहिवासी असलेला आरोपी मनेश जायगुडे हा गेल्या सहा महिन्यांपासून तिचा सतत पाठलाग करत होता. 'तू मला खूप आवडतेस' असे म्हणत त्याने वारंवार तिचा विनयभंग केला



आणि गावात तिची बदनामी केली. एका उमलत्या वयातील मुलीसाठी हा मानसिक छळ असह्य ठरला. आरोपीच्या या सततच्या त्रासाला आणि बदनामीच्या भीतीला कंटाळून अखेर पीडितेने २९ मार्च २०२२ रोजी सकाळी ८ ते ८.४५ च्या सुमारास राहत्या घरी लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेनंतर पीडितेच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून गेवराई पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३०५, ३५४, ३५४-ड आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोक्सो) कलम १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी स्वप्नील आर. राठोड यांनी या संवेदनशील प्रकरणाचा सखोल तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. न्यायालयातील सुनावणी दरम्यान सरकारी पक्षातर्फे एकूण नऊ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये पीडितेच्या कुटुंबातील सदस्य, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी आणि तपासी अधिकारी यांचा पुरावा अत्यंत महत्त्वाचा ठरला. सहायक सरकारी वकील ड. अजय श्रीमंतराव तांदळे यांनी मांडलेला युक्तिवाद आणि सादर केलेले पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले. न्यायालयाने आरोपीला विविध कलमांखाली सहा महिने कारावास आणि दंड न भरल्यास अतिरिक्त एक महिना कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या कायदेशीर लढाईत पोलीस प्रशासनातील विविध अधिकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## युद्धामुळे गॅस टंचाईचे संकट

# केंद्र सरकारकडून देशभरात 'एस्मा' कायदा लागू

**दिल्ली । वृत्तसेवा**

आखाती देशांमध्ये अमेरिका, इस्रायल आणि इराणदरम्यान सुरू असलेल्या ११ दिवसांच्या भीषण युद्धामुळे भारताचा खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देशात घरगुती आणि व्यावसायिक गॅसचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने केंद्र सरकारने आता कठोर पावले उचलली आहेत. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून देशभरात 'एस्मा' (आवश्यक सेवा पुरवठा



अधिनियम) कायदा लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या कायद्यामुळे इंधनाची साठवणूक आणि काळा बाजार करणाऱ्यांवर आता कडक कायदेशीर निर्बंध येतील. तसेच, केंद्र सरकारने तेल शुद्धीकरण कारखान्यांना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. १९६८ च्या या कायद्यानुसार आता इंधन पुरवठ्याशी संबंधित सेवा आणि कर्मचाऱ्यांना कामावर हजर राहणे अनिवार्य असून, अत्यावश्यक सेवा खंडित होणार नाहीत याची खबरदारी घेतली जात आहे. युद्धजन्य परिस्थितीत देशाची इंधन सुरक्षा आणि पुरवठा साखळी सुरळीत राखण्यासाठी सरकारने हे मोठे पाऊल उचलले आहे.

## पान १ वरून

### खा.सोनवणेंनी...

रेल्वे कनेक्टिव्हिटी, राष्ट्रीय महामार्ग आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्प वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याची बाब मांडली. या प्रकल्पांच्या विलंबामुळे आर्थिक विकास आणि रोजगाराच्या संधींवर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जलजीवन मिशनच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींमुळे मराठवाड्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या कायम असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. लोकशाहीत लोकप्रतिनिधींना लोकांच्या समस्या मांडण्याचा अधिकार सुरक्षित राहिला पाहिजे, असे सांगत सरकारने शेतकरी, ग्रामीण विकास आणि प्रादेशिक समतोल विकासासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. * प्रकल्प स्थलांतराचा मुद्दा मांडला : औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्रातून मोठ्या गुंतवणुकीचे प्रकल्प इतर राज्यांकडे वळाल्याबद्दलही त्यांनी चिंता व्यक्त केली. मोठ्या उद्योगांमुळे रोजगारनिर्मिती होऊ शकली असती, मात्र प्रकल्प स्थलांतरित झाल्याने राज्यातील रोजगाराच्या संधींवर परिणाम झाला असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वाढत्या ऑटोमेशनमुळे रोजगारविहीन वाढ होत असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. * बिर्लांच्या भुमिकेला टेबल फॅनचे उदाहरण : लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला कायम पक्षपाती भुमिका निभावत आहेत. ते टेबलफॅनसारखे वागत असून उजव्या बाजूला सत्ताधाऱ्यांकडून बघून हसतात तर डावीकडे (विरोधक) बघून प्रश्न विचारणाऱ्या लोकप्रतिनधींना खाली बसा असे सांगतात. त्यांची हि भुमिका योग्य नसून याच कारणाने आता अविश्वास ठराव आलेला आहे, असेही खा.बजरंग सोनवणे म्हणाले.

### पाटोदा येथे...

रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

### बीड शहरातून...

पोलिसांनीही नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे. रोहन कोलगंडे यांचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे : उंची अंदाजे ५ फूट ७ इंच, रंग गोरा, केस काळे. घरातून बाहेर पडताना त्यांनी अंगात काळ्या रंगाचा टी-शर्ट, निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट व पायात चप्पल घातली होती. सदर व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास किंवा ते कुठे आढळल्यास तात्काळ शिवाजी नगर पोलीस ठाणे किंवा संबंधित कुटुंबीयांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस प्रशासन आणि कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आले आहे.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



# सावित्रीमाईंच्या संघर्षाची जिवंत कहाणी; मेघना झुंझम यांच्या एकपात्री प्रयोगाने प्रेक्षक भारावले

## महिला दिनानिमित्त आयोजित 'खेळ पैठणी'च्या होम मिनिस्टर स्पर्धेत महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

**आष्टी । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रेरणादायी सांस्कृतिक कार्यक्रमात 'मी तुमची सावित्रीबाई फुले' या प्रभावी एकपात्री प्रयोगाने उपस्थितांच्या मनावर अधिराज्य गाजवले. या प्रयोगात सौ. मेघना झुंझम (भिंबरपाटील) यांनी आपल्या दमदार अभिनयातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाची प्रेरणादायी गाथा सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. आष्टी पंचायत समितीच्या प्रांगणात सोमवार, दि. ९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता आष्टी तालुका दूध संघ,आष्टी नगरपंचायत कार्यालय,कासारी, मुर्शदपुर, शिंदेवाडी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त



विद्यमाने आयोजित हा कार्यक्रम पार पडला. मुंबई महानंद संचालिका सौ. प्राजक्ता ताई सुरेश धस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. परिसरातील महिलांसाठी हा कार्यक्रम प्रेरणा, मनोरंजन आणि समाजप्रबोधनाचा संगम ठरला. एकपात्री प्रयोगाद्वारे सौ.मेघना झुंझम यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील संघर्ष, स्त्री शिक्षणासाठी केलेले महान कार्य आणि समाजातील अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य अत्यंत प्रभावीपणे सादर केले. पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू करणाऱ्या सावित्रीमाईंचा इतिहास, समाजाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी केलेली लढाई आणि स्त्री शिक्षणाचा लावलेला दीप या प्रयोगातून जिवंत झाला.

या सादरीकरणाने उपस्थितांना कधी भावूक केले तर कधी हसवले. स्त्री-पुरुष समानता, स्त्रीशक्ती, धाडस आणि शिक्षणाचे महत्त्व यांचा जागर या प्रयोगातून करण्यात आला. सावित्रीमाईंच्या कार्याची आठवण करून देत समाजात परिवर्तनाची प्रेरणा देणारा हा प्रयोग उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला.

यावेळी महिला दिनानिमित्त आयोजित 'खेळ पैठणी'च्या होम मिनिस्टर स्पर्धेत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित कार्यक्रमाचा मनमुराद आस्वाद घेतला.

स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे : प्रथम – सुमित्रा संकेत गायकवाड (आकर्षक पैठणी व फ्रिज, सन्मानचिन्ह)

द्वितीय – ऋतुजा लोंढे (आकर्षक पैठणी व वॉशिंग मशीन, सन्मानचिन्ह)

तृतीय – मनीषा शेळके (आकर्षक पैठणी व ओव्हन, सन्मानचिन्ह)

उत्तेजनार्थ – संगीता हराळ (आकर्षक पैठणी व राईस कुकर, सन्मानचिन्ह)

पाचवा – योगिता रेडेकर (इंडक्शन शेगडी, सन्मानचिन्ह)

सहावा – रेश्मा शास्त्री (टेबल फॅन, सन्मानचिन्ह)

सातवा – इलेक्ट्रिक ब्लेंडर (सन्मानचिन्ह)

आठवा – संगीता साबळे (केतली, सन्मानचिन्ह),

नववा – ज्योती प्रविण पोकळे (इस्त्री, सन्मानचिन्ह),

दहावा – जया वारंगुळे (टिफिन बॉक्स, सन्मानचिन्ह) देऊन विजेत्या महिलांना सन्मानीत करण्यात आले. यावेळी आष्टी तालुका दूध संघ,आष्टी नगरपंचायत कार्यालय,कासारी, मुर्शदपुर, शिंदेवाडी ग्रामपंचायत पदाधिकारी, पत्रकार, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## बलभीमच्या हर्षदा व रेणुका बुगदे यांच्या इनोव्हेशन मॉडेलची राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत निवड

**बीड । प्रतिनिधी**

येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या दोन विद्यार्थीनींनी केंद्रीय क्रीडा व युवा मंत्रालय, भारत सरकार आयोजित विकसित भारत यंग लिडर्स डायलॉग २०२६ मध्ये राज्यस्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट मॉडेल तयार करून राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. यात हर्षदा बुगदे या विद्यार्थीनीने शिक्षण क्षेत्रासाठी 'सर्व शिक्षा सारथी-सेतू लर्निंग ब्रिज मॉडेल बनवले तर रेणुका बुगदे हिने कृषीक्षेत्रावर आधारित-कृषी द्विकृती-ॲग्रो इनोव्हेशन



मॉडेल तयार केले. या दोन्हीही इनोव्हेशन मॉडेलची आयआयटी बॉम्बे यांच्या वतीने गुणवत्ता यादीत निवड करण्यात आली. हर्षदा व रेणुका बुगदे यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष उंदरे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब कोकाटे, रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ. गोविंद बावस्कर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या विद्यार्थीनींचे अभिनंदन केले. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## आदर्श देवगाव येथे महिला दिन उत्साहात साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथे जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते त्यामध्ये महिलांची आरोग्य तपासणी व जागतिक महिला दिनानिमित्त चे महत्व पटवून देण्यात आले आहे. आठ मार्च रोजी साजरा केला जाणारा जागतिक महिला दिन हा महिलांच्या सामाजिक आर्थिक सांस्कृतिक आणि राजकीय कामगिरीचा उत्सव आहे जो स्त्रीशक्तीचा सन्मान करतो आणि लौंगिक समानतेचा संदेश देतो.



आजच्या काळात स्त्रिया शिक्षण संरक्षण व्यवसाय अशा सर्व क्षेत्रात प्रगती करत आहेत म्हणून त्यांचा योग्य सन्मान आणि संधी देणे गरजेचे आहे आज आठ मार्च जागतिक महिला दिन या विशेष दिनाच्या निमित्ताने आजचा दिवस केवळ शुभेच्छा देण्याचा नाही तर स्त्रीच्या त्यागाची तिच्या कष्टाची आणि तिच्या कर्तुत्वाची जाणीव ठेवत आहे . ती एक स्वातंत्र्य शिकते आहे आपल्या घरातील छोट्या समस्या पासून ते देशाच्या सीमेच्या रक्षण करण्यापर्यंत आज तरी प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे समाजात आजही अनेक आव्हाने आहेत पण आता स्त्रिया साक्षर आणि स्वालंबी होत आहेत महिला सक्षमीकरण म्हणजे केवळ त्यांना नोकरी मिळून देणे नाही तर त्यांना स्वतः चे निर्णय घेणे स्वातंत्र्य देणे होय.

गावातील महिलांना बचत गटाच्या माध्यमातून बचत गटाचे महत्त्व पटवून देण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमास उपस्थित.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे डॉक्टर होणे सर, तसेच विशाल बिडकर आरोग्य सेवक, श्रीमती धहीरे मॅडम आरोग्य सेवीका सरपंच मुकुंद सुरवसे महिला सक्षमीकरण या विषयी माहिती प्रवीण खेत्रे सर यांनी दिली कार्यक्रमाला उपस्थित संस्थेच्या सचिव सुनिता लंगडे आणि धान फाउंडेशन येथील स्टार रामकवर लोखंडे मॅडम,सीमा देशमुख, अलका सवलके मॅडम उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे आयोजक धान फाउंडेशन चे मुख्य अधिकारी गोविंद बुरंगे सर हे राहिले. गावच्या माजी सरपंच सौ.मीनाताई सुरवसे आशा कार्यकर्ती मुक्ता कोकाटे गवळी अंगणवाडी सेविका छाया सुरवसे व गावातील विविध बचत गटाच्या अध्यक्ष उपाध्यक्षा सचिव. विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## आहेर धानोरा येथे डिजिटल साक्षरता कार्यक्रम व जागतिक महिला दिन उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

सीएससी (Common Services Centre) व कल्याणी कॉम्प्युटर यांच्या संयुक्त उपक्रमातून आहेर धानोरा येथे डिजिटल साक्षरता जनजागृती कार्यक्रम व जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये गावातील नागरिक, महिला व तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यावेळी उडउ जिल्हा समन्वयक दिनेश जाधव यांनी सीएससी मार्फत उपलब्ध असलेल्या विविध ऑनलाइन सेवा, शासकीय योजना तसेच डिजिटल व्यवहाराबाबत सविस्तर माहिती व मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील नागरिकांनी डिजिटल सेवा व ऑनलाइन सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक अखिल भारतीय मराठा महासंघाचे विनोद आप्पा इंगोले, शेतकरी कामगार पक्षाचे भाई मोहन गुंड, तसेच बापूसाहेब साळुंखे, साप्ताहिक क्रांतिवीरच्या कार्यकारी संपादक तक्षशिला सोनवणे, विनोद लक्ष्मणराव इंगोले, माजी सरपंच मसुराबाई इंगोले, अंगणवाडी सेविका कांता इंगोले, अंगणवाडी सेविका जनता दिवे, मंगल इंगोले, राणी कुडके, खेमाडे आदी महिला व मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण, डिजिटल साक्षरता आणि शासकीय योजनांचा लाभ घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना व नागरिकांना डिजिटल व्यवहाराचे महत्त्व, सुरक्षित ऑनलाइन पेमेंट तसेच विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली.

## गायराण, इनामी प्लॉट धारकांना पिटीआर द्यावेत व आशा पिटीआर धारकांना घरकुल द्यावेत : संजय होळकर

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात गायराण व इनामी प्लॉट धारक आहेत व ते त्या प्लॉटवर पत्र्याचे शेड किंवा कच्चे घर तयार करुन राहतात. त्यांना घरकुल योजनेतुन हक्काचे घर मिळावे म्हणून मागील काही वर्षापुर्वी जननगरसेवक संजय भैय्या बाबुराव होळकर यांनी मागणी केल्या प्रमाणे गायराण प्लॉट वरील रहिवाशीयांच्या नावाची नोंद पिटीआर वर घेवुन त्यांना पिटीआर देण्यात आले होते. तसेच अशा गायराण व इनामी प्लॉटच्या पिटीआर वर घरकुल देखील देण्याची जननगरसेवक संजय भैय्या बाबुराव होळकर यांनी मागणी केली होती. त्याप्रमाणे अशा रहिवाशी यांना घरकुल देखील देण्यात आले आहेत. महत्त्वाचे म्हणजे बीड प्रमाणेच गेवराई शहरातील अचानक नगर



व इतर ठिकाणच्या अशा प्लॉट धारकांना देखील जननगरसेवक संजय भैय्या बाबुराव होळकर यांनी मोर्चा काढुन आंदोलन करुन पिटीआर मिळवुन दिलेले आसून बीड शहरातील आजून अशा गायराण व इनामी प्लॉट वरील असंख्य प्लॉट धारकांची नोंद घेतलेली नाही व त्यांना पिटीआर दिलेले नाहीत. तसेच बऱ्याच गायराण व इनामी प्लॉट धारकांकडे पिटीआर आसून देखील त्यांना घरकुल मंजुरी देणे गेल्या काही महिन्यापासुन थांबवलेले आहे. त्यामुळे अशा उर्वरीत ज्यांना पिटीआर मिळणेबाकी आहे, त्यांची पिटीआर ला नोंद घेवुन त्यांना पिटीआर द्यावेत व ज्यांना पिटीआर मिळालेले आसून सुध्दा घरकुल मिळणेबाकी आहे त्यांना शासनाच्या महत्वाकांक्षी घरकुल योजने पासुन वंचित ठेवु नये व यापुर्वी प्रमाणे त्यांना घरकुल मंजुरी द्यावी अशी लेखी निवेदनाव्दारे जननगरसेवक संजय भैय्या बाबुराव होळकर यांनी मा. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व मा. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड शैलेश फडसे यांच्याकडे केली आहे.

## ग्रामीण रुग्णालय, रायमोहा येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत ७२ बालकांची नेत्र रोग तपासणी

**शिरूर । प्रतिनिधी**

दि.१०रोजी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण रुग्णालय, रायमोहा येथे नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले.सदर शिबीर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सतीशकुमार सोळंके, निवासी आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ, निवासी वैद्यकीय अधिकारी बाह्यसंपर्क डॉ.एल.आर. तांदळे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.राजेश तांदळे,ग्रामीण रुग्णालय, रायमोहा चे वैद्यकीय अधीक्षक डॉ.राहुल टेकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.यावेळी दिशांत दिलीपराव मोराळे नेत्र चिकित्सा अधिकारी बीड,यांनी एकूण ७२ बालकाची नेत्र तपासणी यशस्वीरित्या केली. सदर तपासणीमुळे मुलांना नेत्र दोष दुर होण्यास मदत केली.१२ विद्यार्थ्यांना नंबरचे चष्मा देण्यात



येणार आहेत.८ विद्यार्थ्यांना शस्त्रक्रिया साठी जिल्हा रुग्णालय बीड येथे रेफर करण्यात आले.यावेळी स्वत:वैद्यकीय अधीक्षक डॉ राहुल टेकाडे उपस्थित होते.सदर शिबिर आयोजित करून ते यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधिकारी डॉ.दीपाली नरवडे ,राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम रुग्णालय रायमोहा येथील आर.बी. एस.के डॉ .संभाजी तांबारे, डॉ. विकास कंठाळे, डॉ.संध्या लाटे, डॉ. सुष्मा सानप , इन्चार्ज चोले व ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## शिक्षण महर्षी गोविंदराव वाघ उर्फ नाना यांचे कार्य आणि विचार पुढील पिढीसाठी प्रेरणादायी, नाना देहाने नसले तरी विचारांनी सदैव सोबत : गणेशराव वाघ

### शिक्षण महर्षी गोविंदराव वाघ यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

जीवनात कार्य करताना अडचणी येतातच; मात्र खचून न जाता खंबीरपणे लढत राहणे हेच यशाचे खरे गमक आहे. शिक्षणमहर्षी गोविंदराव वाघ उर्फ 'नाना' यांनी दिलेली ही प्रेरणादायी शिकवण आजही समाजाला मार्गदर्शक ठरत आहेत. म्हणूनच नानांच्या विचारांचा आणि कृतीचा वारसा घेऊन त्यांनी सांगितलेल्या सन्मार्गानेच आपण आपले काम करत राहू. नाना आज देहाने आपल्यात नसले तरी विचाराने आपल्यासोबत कायम आहेत, असे भावूक प्रतिपादन शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेशराव वाघ यांनी शिक्षणमहर्षी गोविंदराव वाघ 'नाना' यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून

बोलताना केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सुदामतीताई वाघ (मोठ्याबाई), नामदेवराव वाघ, बाळासाहेब धुमाळ यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव शिक्षण महर्षी गोविंदराव वाघ यांच्या जयंतीच्या निमित्ताने शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने रविवार दिनांक ८ मार्च रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षण महर्षी स्व. गोविंदराव वाघ उर्फ नानांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर काही निवडक मान्यवरांनी नानांच्या संपूर्ण आयुष्यावर, कार्यावर विचार मांडले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना गणेशराव वाघ सर यांनी शिक्षण महर्षी गोविंदराव वाघ उर्फ नाना यांचे संपूर्ण जीवन चरित्र उपस्थितांच्या समोर उलगडले. यावेळी बोलताना गणेश वाघ सर म्हणाले की, बीड तालुक्यातील नाळवंडी सारख्या ग्रामीण भागातून शिक्षक म्हणून नानांनी आपल्या कार्याची सुरुवात केली. यावेळी त्यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या अडचणी जवळून अनुभवल्या, सुविधांच्या अभावामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे पाहून त्यांनी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. नानांच्या विचारांवर थोर साधू संत- महंत, छत्रपती श्री शिवाजी महाराज, महात्मा गांधी, महात्मा फुले राजर्षी शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर या थोर महापुरुषांच्या विचारांचा मोठा पगडा होता. महात्मा गांधीजीच्या विचारा प्रमाणे नानांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी होती. नानांनी शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून केवळ शिक्षणाचा प्रसार केला नाही, तर अनेकांना रोजगाराची संधीही उपलब्ध करून दिल्या आहेत. नानांच्या ठायी असलेली गोरगरीब विद्यार्थ्यांबद्दलची कणव, दातृत्व आणि आपुलकी यामुळे त्यांचा मोठा मित्रपरिवार आणि चाहतावर्ग निर्माण झाला आहे. त्यामुळे शेकडो आजी-माजी विद्यार्थी आजही नानांना प्रेरणास्थान मानतात. त्यांच्या या कार्यात त्यांच्या सहचारिणी सुदामतीताई वाघ (मोठ्याबाई) यांचेही मोलाचे योगदान राहिले आहे. गोरगरीब वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बाई आणि नाना यांनी आपले आयुष्य समर्पित केले आहे. बाई- नाना यांच्या या कार्याची दखल घेऊन समाजातील सुज्ञ नागरिक या दोघांनाही आधुनिक काळातील 'फुले दांपत्य' असे संबोधतात. नाना शेवटपर्यंत शिक्षण क्षेत्रात कार्यरत राहिले होते. संपूर्ण हयात शिक्षण क्षेत्रासाठी समर्पित करणाऱ्या शिक्षण महर्षी गोविंदराव वाघ उर्फ नानांचे विचार आज क्षणाक्षणाला आठवतात. जीवनात काम करताना खूप अडचणी येतात; मात्र त्यावेळी खचून न जाता खंबीरपणे लढत राहणे हेच यशाचे खरे गमक आहे असे नाना सर्वांना आवर्जून सांगत असत. नाना आज देहाने आपल्यात सोबत नाहीत परंतु विचाराने कायम आपल्या जवळच आहेत. 'नानांनी दिलेली प्रेरणादायी शिकवण, विचार आणि त्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य आजही आपल्या सर्वांना मार्गदर्शक ठरत आहे. त्यांच्या जयंतीदिनी त्यांच्या विचारावर आणि आदर्शावर वाटचाल करणे हीच खऱ्या अर्थाने नानांना आदरांजली ठरेल अशा शब्दात गणेशराव वाघ सर यांनी आपल्या भावना व्यक्त केला. या कार्यक्रमाला आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक, यांच्यासह शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १७६/२०२६**

**आसाराम पि. सातीराम माने वि. निरंक**

ज्याअर्थी **मयत नामे सातीराम पि. रामभाउ माने रा. भाटेपुरी, ता. गेवराई जि.बीड हे / हया दिनांक ११/१२/२०२४ रोजी भाटेपूरी ता. गेवराई जि.बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, **अर्जदार आसाराम पि. सातीराम माने वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. भाटेपुरी ता. गेवराई जि.बीड** यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सातीराम पि. रामभाउ माने यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ०७/०३/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**पुढील तारीख – १५/०४/२०२६**

**(मार्फत – ॲड आर.ए. जोशी, गेवराई)**

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गेवराई

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार दि. ११ मार्च २०२६ ●

## थोडक्यात...

### उमापूर गावाचा सामाजिक सलोखा अभिमानास्पद



**उमापूर । प्रतिनिधी**

देशभरात अनेक ठिकाणी हिंदू-मुस्लिम द्वेशाचे वातावरण होत असताना उमापूर येथे दि. ३१ मार्च पासून प्रारंभ होत असलेल्या श्री क्षेत्र नारायण गडाच्या ७४ व्या नारळी सप्ताह निमित्त जोरदार तयारी सुरु आहे तर दुसरीकडे मुस्लिम धर्मीयांचा रमजान महिना सुरु आहे, द्वेशाच्या वातावरणात सप्ताह समितीच्या वतिने मुस्लिम बांधवांसाठी रोजा ईफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते गजबजलेल्या मरकज मस्जिद समोरील पटांगणात ईफ्तार पार्टीत एकाच पंगतीत हिंदू मुस्लिम फराळ घेत असल्याचे चीत्र होते, हा प्रेमाचा, बंधुतेचा आणि सामाजिक सलोख्याचा ऐतिहासिक आणि अभिमानास्पद असा सोहळा होता.

### राम नवमीच्या चौसाळा अध्यक्ष पदी प्रसाद देशमुख यांची निवड



**चौसाळा । प्रतिनिधी**

रामनवमीनिमित्त चौसाळा येथील हनुमान मंदिरात रामनवमी उत्सवाचे संस्थापक अध्यक्ष संदेशशेठ खिंवसरा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न होऊन अनेक विषयावर चर्चा करण्यात आली २६ मार्च २०२६ रोजी रामनवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे या रामनवमी उत्सवाच्या चौसाळा अध्यक्षपदी प्रसाद ( बाबू ) देशमुख यांची सर्वानुमते निवड करण्यात आली तर त्यांना सहकार्य करण्यासाठी उपाध्यक्ष म्हणून आकाश रामचंद्र काळे कोषाध्यक्ष म्हणून कुमार भाऊसाहेब मिटकरी तर सचिव म्हणून रविराज वेदपाठक यांची निवड करण्यात आली महादेव बप्पा नाईकवाडे, बाळू काका नहार यांची मार्गदर्शक म्हणून निवड करण्यात आली तर महावीर लिंगे, महावीर गिराम, अमोल शेटे व सर्व तरुण वर्ग यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली प्रसिद्धी प्रमुख म्हणून चौसाळा ग्रामपंचायतचे सदस्य विकास नाईकवाडे, विठ्ठल सर्वज्ञ यांच्यावर जबाबदारी देण्यात आली यावेळी बैठकीसाठी अक्षय भैय्या हुलजुते, भाऊ चौधरी, शंकर मिटकरी बंकट शिंदे तसेच अनेक मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते.

### वाढत्या उन्हाने पिंपळनेरकर हैराण; रसवंतीसह थंड पेय स्टॉलवर वाढली गर्दी

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

मार्च महिन्याची सुरुवात होताच बीड तालुक्यात उन्हाचा कडाका वाढू लागला आहे. तसेच, वाढत्या उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. यापासून संरक्षण मिळण्यासाठी नागरिकांची थंड पेयाच्या स्टॉलवर गर्दी वाढताना दिसत आहे. गेल्या आठवड्यापासून तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. दिवसभर अंगाची अक्षरशः लाही लाही होत आहे. प्रखर उन्हामुळे दुपारच्या वेळेत रस्त्यांवरही वर्दळ कमी होताना दिसत आहे. उकाड्यापासून दिलासा मिळावा म्हणून थंड पेये, आईस्क्रीम पार्लर आणि रसवंतिगृहांवर गर्दी होत आहे. दिवस-रात्र उकाडा आणि त्यातच डासांचाही प्रादुर्भाव वाढला आहे. परिणामी, नागरिकांची झोप उडाली आहे.

# शासकीय औद्योगिक संस्थेचा दोनच शिक्षकावर चालतो कारभार

## शेकडा विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला ! उर्वरित शिक्षकांची पदे तात्काळ भरा



**शिरूर । प्रतिनिधी**

तालुक्याचे ठिकाण असताना या ठिकाणी ग्रामीण भागातील विद्यार्थी आपल्या व्यावसायिक स्वप्नाला आकार देण्यासाठी प्रशिक्षण घेण्यासाठी येत असतात परंतु त्यांच्या भविष्याशी खेळ या ठिकाणी होताना दिसत आहे कारण शहरातील नामांकित असणाऱ्या संत वामनभाऊ शासकीय औद्योगिक संस्था केवळ नावाला आहे काय अशी शंका आता येऊ लागली आहे कारण एकूण आठ कोर्स असताना त्यासाठी चार शिक्षक या ठिकाणी उपलब्ध असून त्यातीलही दोन शिक्षक हे प्रतिनियुक्त वर इतरत्र पाठवले आहेत ही मोठी शोकांतिका या ठिकाणी दिसून येत आहे यावर कोणीही बोलताना दिसत नाहीये कारण शिक्षक असो वा कर्मचारी हे ज्या ठिकाणी आपली नोकरी असते त्या ठिकाणी त्यांना राहणे बंधनकारक असते परंतु या संस्थेत मात्र परजिल्ह्यातून शिक्षक ये जा करतात या प्रवासाला किती वेळ लागत असेल याचा विचार करणे गरजेचे आहे यासाठी दररोज शिक्षिक वेळेवर पोहोचतात का? तर अजिबात नाही असे या ठिकाणी प्रथम दर्शनी दिसते आहे. परंतु याला फाटा देत कर्मचारी त्यांच्या सोयीनुसार ये जा करतात शेकडो विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे दोन शिक्षक याठिकाणी उपलब्ध असून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ विभागाने घातला आहे. यासाठी संबंधित विभागाने तातडीने कारवाई करून सर्व कार्सेसला शिक्षक उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी विद्यार्थी व पालक वर्गातून होत आहे.

# आडुळा वाळू घाटावर बेसुमार वाळू उपसा

## पोलिस व महसूल विभागाच्या नाकावर टिचून कारभार, 'तहसीलदार सुद्धा मॅनेज'ची चर्चा



**माजलगाव । प्रतिनिधी**

परिसरातील आडुळा वाळू घाटावर गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. पोलिस व महसूल विभागाच्या नाकावर टिचून हा उपसा सुरू असून स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर ट्रॅक्टर व डंपरच्या साहाय्याने नदीपात्रातून वाळू काढली जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

स्थानिकांच्या मते, आडुळा घाटावर रोज रात्री उशिरापर्यंत ट्रॅक्टर आणि डंपरची वर्दळ सुरू असते. नदीपात्रात थेट यंत्रसामग्री उतरवून वाळू उपसा केला जात आहे. या अवैध कारभारामुळे नदीपात्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे हा प्रकार प्रशासनाच्या नजरेसमोरच सुरू असल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, रात्रीच्या वेळी घाटावर अनेक ट्रॅक्टर रांगेत उभे असतात आणि काही वेळातच डंपर भरून बाहेर पडतात. या वाहनांची ये-जा गावातील मुख्य रस्त्यावरून सुरू असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. धुळीचे प्रमाण वाढल्याने आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्याचेही काही नागरिकांनी सांगितले.

या अवैध वाळू उपशामागे मोठे रॅकेट कार्यरत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. विशेष म्हणजे तहसीलदार सुद्धा मॅनेज आहेत अशी चर्चा स्थानिकांमध्ये रंगली आहे. त्यामुळेच इतक्या मोठ्या प्रमाणात उपसा सुरू असूनही कारवाई होत नसल्याचा आरोप केला जात आहे. पोलिस व महसूल विभागाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचीही चर्चा नागरिकांमध्ये ऐकू येत आहे.

काही सामाजिक कार्यकर्त्यांनी याबाबत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असला तरी अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. उलट वाळू माफियांचा आत्मविश्वास वाढल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष घालून या अवैध वाळू उपशावर आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, आडुळा वाळू घाटावर सुरू असलेल्या या बेसुमार वाळू उपशाची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी खडक परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. प्रशासनाने तातडीने कारवाई करून पर्यावरणाचे व स्थानिकांचे नुकसान थांबवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### सरसकट कर्जमाफी नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचा अर्थसंकल्प मांडताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणा केली. निवडणुकीपूर्वी सातबारा कोरा करण्याची घोषणा केली होती. परंतु, तशी घोषणा न झाल्याने शेतकरी नाराजी व्यक्त करत आहेत. गेल्या वर्षभरापासून शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी होणार, सातबारा कोरा होणार, अशा चर्चा होत्या. जून २०२६ पूर्वी हा निर्णय घेऊ, असेही सत्ताधारी नेत्यांनी सांगितले होते. अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेवेळी कर्जमाफीतील अटी, तरतुदी, पात्र या शब्दांमुळे पुन्हा एकदा शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणे तर दूरच; परंतु दोन लाखांपर्यंतचे कर्ज नेमके कसे माफ होणार, हेदेखील स्पष्ट करण्यात आलेले नाही.

## म्हाळसजवळा ग्रामपंचायतीतील मग्रारोहयो कामांची विभागीय चौकशी होणार



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील मौजे म्हाळसजवळा ग्रामपंचायतीत करण्यात आलेल्या मग्रारोहयो (मनरेगा) अंतर्गत कामांबाबत विभागीय स्तरावर प्रशासकीय व तांत्रिक चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संजय शिरसाट, मंत्री सामाजिक न्याय विभाग व पालकमंत्री छत्रपती संभाजीनगर यांनी याबाबत पत्र काढले असून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर रामेश्वर खांडे पाटील यांनी म्हाळसजवळा येथील मग्रारोहयो अंतर्गत झालेल्या विविध कामांमध्ये अनियमितता झाल्याची तक्रार करून चौकशीची मागणी केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कामांची प्रत्यक्ष पाहणी, झालेल्या कामांचा तपशील तसेच या प्रकरणात नोंदविण्यात आलेल्या फौजदारी गुन्ह्यांचा विचार करून विभागीय स्तरावर प्रशासकीय व तांत्रिक तपास करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या चौकशीदरम्यान कामांमध्ये तांत्रिक त्रुटी किंवा कोणताही गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. दरम्यान, या प्रकरणी पुढील कार्यवाहीसाठी पत्र विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना पाठविण्यात आले आहे.



*बीड शहरातील बीबी जाधव सीए साहेब व नारायण गाडे सीए यांनी आज रोजी बीड शहरातील भारतीय जनता पक्षाचे नेते नवनाथांना शिराळे यांचे ज्येष्ठ चिरंजीव एडवोकेट गोविंद नवनाथ शिराळे पाटील यांचा नगरसेवक म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला यावेळी पुणे येथील ज्येष्ठ वकील श्रीकांत अगस्ते साहेब, अँड संदीप चोरगे साहेब, अँड सुहास कांदे साहेब ,कृष्णा नवनाथ शिराळे पाटील पुणे येथील वकील मंडळी इत्यादी यावेळी उपस्थित होते*

### मावलाई श्री पत्रकारिता, क्रीडा, सामाजिक राज्यस्तरीय पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील मावलाई युवक क्रीडा मंडळ व व्यायामशाळा बऱ्हाणपूर यांच्या विद्यमाने गेल्या १७ वर्षापासून मावलाई देवी यात्रे निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राजस्तरीय पुरस्कार दिले जातात. यावर्षी मावलाई श्री पत्रकारिता, क्रीडा, सामाजिक राज्यस्तरीय पुरस्कार दिले जाणार असून यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या वर्षी पत्रकारिता पुरस्कार, धार्मिक लिखाण करणारे व त्यावर शोधवार्ता करणाऱ्या पत्रकारांना हा पुरस्कार दिला जाणार आहे. तसेच सामाजिक क्षेत्रात समाजासाठी उल्लेखनीय कार्य व त्याचा समाजाला झालेला फायदा हा समाज सेवकाला पुरस्कार दिला जाणार आहे. क्रीडा क्षेत्रात प्रचार व प्रसार अनेक खेळाडू तयार करुन किती खेळाडू शासकीय नौकरीत लावले, तसेच शिवछत्रपती पुरस्कार मिळाला असेल तर अशा उत्कृष्ट क्रीडा खेळाडूस, प्रशिक्षकास हा राज्यस्तरीय मावलाई क्रीडा पुरस्कार दिला जाणार आहे. या पुरस्कार निवडीसाठी समिती नेमण्यात आली असून ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी, पत्रकार दिनेश लिंबेकर, धनंजय बजगुडे, सुशील देशमुख व अविनाश वाघीरकर हे काम पहाणार आहेत. या पुरस्कारासाठी रोख रक्कम, शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. दि. २० मार्च २०२६ पर्यंत भागवत वराट, संत नामदेव नगर (पूर्व) बीड, मो. ९१७२८४२१६३ अथवा धनंजय बजगुडे पाडळशिंगी ता. गेवराई या पत्त्यावर आपण केलेले कार्य व वर्तमानपत्राचे कात्रण फोटोसह पाठवावे असे आवाहन विष्णु यादव, भागवत वराट यांनी केले आहे.

# आजच्या तरूणांनी शिवरायांचे विचार आत्मसात करावेत हीच खरी शिवजयंती ठरेल: परमेश्वर सातपुते





**पिंपळनेर । प्रतिनिधी**

सर्कलमधील मौजे चव्हाणवाडी येथे युवानेते विद्यानाथजी तोडेकर यांच्या पुढाकाराने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शिवचरित्रकार राहुल गिरी यांच्या प्रेरणादायी शिवव्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आजच्या तरूणांनी शिवरायांचे विचार आत्मसात करावेत हीच खरी शिवजयंती ठरेल चव्हाणवाडी येथे आयोजित शिवजयंती कार्यक्रमाप्रसंगी बोलताना शिवसेनेचे मा.जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी व्यक्त केले मनोगत. या कार्यक्रमाला परिसरातील शिवप्रेमी व ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात उपस्थिती लावली होती.

कार्यक्रमास शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्यासह भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुंदर भाऊ चव्हाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव यशवंत भाऊ कदम, गावचे सरपंच ज्ञानेश्वर माऊली शिंदे, तुळशीदास भाऊ पवार, मुकादम नामदेवजी तोडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती,यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शिवचरित्रकार राहुलजी गिरी यांनी आपल्या ओजस्वी व प्रेरणादायी भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रम, स्वराज्याची स्थापना, त्यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व तसेच समाजासाठी दिलेले आदर्श यांचे सविस्तर वर्णन केले. त्यांच्या व्याख्यानामुळे उपस्थितांमध्ये स्वराज्य, राष्ट्रभक्ती ची प्रेरणा निर्माण झाली.

यावेळी परमेश्वर सातपुते सर यांनी देखील उपस्थितांना मार्गदर्शन करताना शिवाजी महाराजांचे विचार आणि आदर्श आपल्या जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले. तसेच शिवजयंतीच्या निमित्ताने असा प्रेरणादायी उपक्रम राबवल्याबद्दल युवानेते विद्यानाथजी तोडेकर व सर्व गावकऱ्यांचे त्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुंदर भाऊ चव्हाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव यशवंत भाऊ कदम, गावचे सरपंच ज्ञानेश्वर माऊली शिंदे, तुळशीदास भाऊ पवार यांनीही शिवचरित्रावरती मार्गदर्शन केले. कार्यक्रमास सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती कुक्कडगावचे अध्यक्ष मच्छिंद्रजी शिंदे, राम भैय्या नवले, सिद्धार्थ शिंदे, सनराईज इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर सातपुते सर, युवानेते राजाभाऊ चव्हाण, ग्रा.स.लक्ष्मण घिगे, दत्ता पवार, प्रेमराज बचाटे, सुरेश तोडेकर, बापुराव जिजा चव्हाण, वैजीनाथ डोंगरे, बंडू काका तोडेकर, प्रल्हाद तोडेकर, आसाराम तोडेकर, लक्ष्मण चव्हाण, अमर तोडेकर, चांगुजी चव्हाण, भागवत घिगे, महादेव तोडेकर, दिलीप चव्हाण, अक्षय चव्हाण, मदन चव्हाण, माऊली सावंत, चंद्रसेन सावंत तसेच सर्व सहकारी व गावकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.